
मृद्गंध
'छात्र प्रबोधन 'मधील
कुमार कथांचा संग्रह

# मृद्गंध

## 'छात्र प्रबोधन'मधील निवडक कुमारकथांचा संग्रह

संपादन
शैलजा देशमुख

छात्र प्रबोधन
**ज्ञान प्रबोधिनी**
५१०, सदाशिव पेठ,
पुणे - ४११ ०३०.



# मृद्गंध

(‘छात्र प्रबोधिन’ मधील
निवडक कुमारकथांचा संग्रह)

**प्रकाशक व मुद्रक**
प्रा. महेन्द्र सेठिया
संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, पुणे ३०

**अक्षर जुळवणी**
छात्र प्रबोधन, पुणे ३०

**मुखपृष्ठ व आतील चित्रे**
श्री. भास्कर सगर

© स्वामित्व प्रकाशकाचे स्वाधीन

**प्रथम आवृत्ती :** सौर भाद्रपद, शके१९२२, सप्टेंबर २०००

**किंमत**
रुपये ६०/-

**Mrudgandh**
(Compilation of stories selected from 'Chhatra Prabodhan')

# प्रस्तावना

लहानपणापासून मुलांना कथा ऐकणं, वाचणं खूप आवडतं. ही सहजप्रवृत्ती आहे. अगदी सुरुवातीला, काऊ-चिऊ, वाघ, सिंह, कोल्हा पशु-पक्षी इत्यादी, कल्पनेतील पऱ्या-राक्षस यात रमणारं बालमन, शिकत शिकत, अनुभव घेत मोठं व्हायला लागतं.आपल्या भावविश्वाशी जुळणारं वाङ्मय ते शोधायला लागतं.

सतत वेगाने विस्तारणारं मुलांचं भावविश्व अनुभवातून संपन्न होऊ पाहातं. बाल्यावस्थेतून किशोर-कुमार अवस्थेकडे झुकणाऱ्या मुलाला सगळं अवकाश आपल्या हाती आल्यासारखं वाटतं. सभोवतालच्या माणसांचे भावबंध कळायला लागतात. चांगल्या-वाईटाचं भान येऊ लागतं. ना धड बाल, ना धड युवा अशा सीमारेषेवरील कुमारांचं मन खूप संवेदनशील असतं. ते चटकन प्रतिक्रिया देतं. या टप्प्यावर कथेच्या माध्यमातून त्यांचं भावविश्व अधिक समृद्ध होऊ शकतं अन् ही प्रक्रियाही खूप आनंद देणारी असते.

'छात्र प्रबोधन' हे मासिक खास कुमारांसाठी प्रकाशित केले जाते. त्यामुळे त्यातील वाङ्मय हे जाणीवपूर्वक, खास कुमार वयोगट डोळ्यांसमोर ठेवून लिहिलेले आहे. मासिकाला आठ वर्षे पूर्ण झाल्याच्या टप्प्यावर, मागे वळून पाहाताना असं जाणवलं, की कुमारांसाठी सुंदर कथांचा खूप मोठा खजिना आपल्याजवळ आहे. तो एकत्रितपणे वाचकांना उपलब्ध करून द्यावा; भावी काळातील कुमार वाचकांसाठी हे अनमोल साहित्य, पुस्तकरूपाने एकत्रित केलेले असावे; या दुहेरी हेतूने 'छात्र प्रबोधन'मध्ये प्रकाशित झालेल्या कथांपैकी निवडक कथांचे छोटे चार कथासंग्रह अगदी अल्प किंमतीत उपलब्ध करून देत आहोत. त्यातील 'दरवळ' हा पहिला कथासंग्रह आपण वाचलाच असेल. याच मालिकेतील 'मृद्‌गंध' हा दुसरा कथासंग्रह आमच्या वाचकांसमोर ठेवताना, आम्हाला खूप आनंद होत आहे.

लघुकथा या वाङ्मयप्रकारातील विविध प्रकार, विविध विषय, वेगवेगळ्या लेखकांच्या शैलींमधील वैविध्य, या सर्वांची कुमारवाचकांना ओळख व्हावी यादृष्टीने कथासंग्रहात, साहसकथा, विज्ञानकथा, भावकथा, अनुवादित कथा, रूपांतरित कथा, वन्यजीवनावर आधारित कथा, ऐतिहासिक कथा, सामाजिक आशयाच्या कथा, अशा विविध प्रकारच्या कथा येथे समाविष्ट केल्या आहेत.

छोटे पाडस म्हणून घरी आलेल्या 'मनोली'चा मातृत्वापर्यंतचा प्रवास आणि 'छाया'चे तिच्याशी असलेले भावबंध यातील गोडवा मनाला मोहवून टाकेल. 'लालबुंद डोळे' सारख्या ऐतिहासिक कथेत कथाकार कल्पनेने इतिहासाला ललित रूप कसे देतो, याचा वस्तुपाठ मिळेल. आयगर - पर्वतावरील गिर्यारोहणाची चित्तथरारक गाथा, अजगराच्या जबर विळख्यातून सुटका करून

घेतानाचे धाडस अन् काळोख्या रात्री स्वराज्याचं रक्षण करणाऱ्या सैनिकांना वाट दाखविणाऱ्या झिम्याचं मनोधैर्य, ही सर्व साहसाची विविध रूपे आपल्याला निरनिराळ्या कथांमधून भेटतील. 'जगणे एक अपराध' आणि 'गुप्तधन' या दोन अनुवादित कथा; पण दोन्ही कथांची जातकुळी वेगळी.

'रोजच्या कंटाळवाण्या जीवनात' बदल शोधणारा 'डमी' या कथेचा नायक यश यातून बाहेर पडायला एक अभिनव मार्ग शोधून काढतो तर 'भूतबीत' प्रत्यक्षात कुठे नसतंच आपल्या मनात असतं हे रोचकपणे सांगणारी 'मनातलं भूत' ही कथा कुणालाही आवडेल अशीच !

'रुसवा' या कथेतील एका शिक्षणाची ओढ असलेल्या; पण आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने त्याविषयी तडजोड करावी लागणाऱ्या मुलीची हृदयंगम गोष्ट मनाला भिडेल. 'ते चार दिवस'ही म्हटलं तर एक युद्धकथा! युद्धभूमीवर शत्रूचा सैनिक शेजारी मृत होऊन पडलेला असतानाही स्वत:चे मनोधैर्य टिकविणाऱ्या एका सैनिकाच्या भावविश्वाचं एक वेगळंच दर्शन या कथेतून घडेल.

एकूण या कथांचे वैशिष्ट्य हे की कुमारांचे भावविश्व, त्यांना काय आवडते हे ध्यानात घेऊन अनेक प्रथितयश, तसेच ताज्या दमाच्या नव्या लेखकांनी लिहिलेल्या सुंदर कथा या संग्रहात तुम्हांला वाचायला मिळतील. मुलांच्या कल्पनाश तीचा विकास, भावविश्वाची व अनुभवविश्वाची समृद्धी, भोवतालच्या जगाचे आकलन, सहसंवेदनाजागृती, त्यातून भावकोषसमृद्धी, असे अनेक परिणाम या कथा साधतात. दूरदर्शनवरील नवनव्या वाहिन्या, इतर दृकश्राव्य माध्यमे यांच्या विळख्यात अडकू पाहणाऱ्या मुलांच्या मनाचा विकास व्हावा, त्यांच्या अभिरुचीला चांगले वळण लागावे, लहान वयातच चांगले काय नि वाईट काय याचा नीर-क्षीर-विवेक त्यांना करता यावा, भावी आयुष्यात साहित्याचा आस्वाद घेता यावा, पुस्तकांची साथसंगत वाढावी, या सर्वांपेक्षाही आनंदाचे निधान सापडावे, या हेतूंनी हा कथासंग्रह प्रकाशित करीत आहोत. या सुंदर कथांचा सुगंध सर्वत्र पसरावा आणि चिरकाल टिकावा ही सदिच्छा! मुलांना चांगले व आवडेलसे काय वाचायला द्यावे हा विचार पालक-शिक्षकांना पडत असतो. या कथासंग्रह मालिकेच्या रूपाने सुंदर कुमारकथांचे दालन आम्ही आपल्यासाठी खुले करीत आहोत !

**अंकातील दर्जेदार कथांचे पुस्तकरूपाने संकलन करण्यासाठी, सर्व कथाकारांनी उत्स्फूर्तपणे परवानगी दिली व आम्हाला प्रोत्साहन दिले, त्याबद्दल सर्वांचे आम्ही ऋणी आहोत !**

सौर भाद्रपद १०, शके १९२२ **-शैलजा देशमुख**

१ सप्टेंबर २०००

# अनुक्रम


| | | | पान क्र. |
|---|---|---|---|
| १. | मनोली एक पाडस | - मारुती चितमप ी | ०२ |
| २. | लालबुंद डोळे | - निनाद बेडेकर | १० |
| ३. | जगणे एक अपराध | - वैजयंती केळकर | १८ |
| ४. | अजगराच्या जबर विळख्यात | - विजय देवधर | २३ |
| ५. | आयगर स्वप्नपर्वत | - आनंद पाळंदे | ३५ |
| ६. | परिसाच्या संगे लोह बी घडले | ।- विवेक पोंक्षे | ४३ |
| ७. | गुप्तधन | - मृणालिनी गडकरी | ४९ |
| ८. | हलाहल | - मुकुंद जोगळेकर | ६२ |
| ९. | रुसवा | - अनुराधा वैद्य | ७४ |
| १०. | डमी | - अश्विनी धोंगडे | ८४ |
| ११. | मनातलं भूत | - हरिहर आठलेकर | ९२ |
| १२. | ते चार दिवस | - शैलजा देशमुख | ९८ |

## ज्ञान प्रबोधिनीची शैक्षणिक प्रकाशने

**१. व्यि तविकासासाठी विद्याव्रत** **रु.६०**
(सर्वांगीण व्यि तिमत्त्व विकासासाठी समग्र मांडणी)

**२. नावीन्यपूर्ण प्रकल्प कसे करावेत ?** **रु.५०**
(प्रकल्पासंबंधी अनुभवातून लिहिलेले पुस्तक)

**३. प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास** **रु.५०**
(ललित लेखन कसे करावे याचा मूलमंत्र देणारे पुस्तक)

**४. कल्पक बनू या** **रु.६०**
(कल्पनाश ती वाढविण्याची गुरुकि ी सांगणारे पुस्तक)

**५. रूप पालटू शिक्षणाचे** **रु.३०**
(ज्ञान प्रबोधिनीतील शैक्षणिक भूमिका व नमुना उपक्रमांची रूपरेषा)

**६. वेध यशाचा** **रु.७०**
(स्वत:चा अभ्यास स्वत: करण्यासाठी उपयु त तंत्रे)

**७. असे घटते सुंदर अक्षर** **रु.१०**
(हस्ताक्षर सुधारण्यासाठी कृतिपुस्तिका)

**८. हसत खेळत बुद्धिविकास** **रु.१००**
(बुद्धिच्या विविध पैलूंसाठी विविध खेळ)

**९. बुद्धीवैभव** **रु.२०**
(बुद्धीचे १२० पैलू उलगडून सांगणारे पुस्तक)

**१०.प्रज्ञाबोध मालिका–५ पुस्तकांचा संच** **रु.२००**
(राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेसाठी उपयुक्त–दोन्ही माध्यमांमध्ये)

**११.छंद आकाशदर्शनाचा** **रु.६०**
(आकाशातील नक्षत्रे–ताऱ्यांचा परिचय)

**१२.गिर्यारोहणगाथा** **रु.४०**
(गिर्यारोहणाची प्राथमिक माहिती व प्रेरणा देणारे पुस्तक)

**१३.प्रबोधन गीते** **रु.१५**
(ज्ञान प्रबोधिनीतील स्फूतिगीतांचा संग्रह)

**१४.'छात्र प्रबोधन'मधील निवडक कुमार कथांचे संग्रह**
**१. दरवळ रु.४० ३. मृद्गंध रु.६०**
**२. बहर रु.५० ४. मोहोर रु.६०**

**१५.वाचलेच पाहिजे असे काही –भाग–१** **रु.२५**
(२० पुस्तकांचा परिचय व ५० वाचनीय पुस्तकांची यादी)

**ज्ञान प्रबोधिनीची इतरही प्रकाशने उपलब्ध !**

**संपर्क पत्ता**

छात्र प्रबोधन,ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ,
पुणे ४११०३० ☎ ( (०२०) ४४७७६९१,४४७८०९५

'ज्ञानप्रबोधिनी' द्वारा कुमारांसाठी प्रकाशित केल्या जाणाऱ्या 'छात्र प्रबोधन' मासिकातील, मनात रेंगाळत राहिलेल्या सुंदर कथांचा सुगंध 'दरवळ', 'मृद्गंध', 'बहर' व 'मोहोर' या चार पुस्तकांद्वारे आपल्यापर्यंत पोहोचवत आहोत.

आयगर पर्वतावरील गिर्यारोहणाची चित्तथरारक गाथा, अजगराच्या जबर विळख्यातून सुटका करून घेतानाचे धाडस, 'गुप्तधन' सारखी अनुवादित कथा, 'मनातलं भूत', 'डमी', 'रुसवा' या कुमारांचे भावविश्व रेखाटणाऱ्या कथा, 'ते चार दिवस' ही युद्धकथा, अशा विविध कथांनी नटलेला हा कथासंग्रह, कुमार वाचकांना नक्कीच आवडेल असा आहे.

तप्त मातीवर पडलेल्या पहिल्या पावसाच्या शिडकाव्याने निर्माण होणारा 'मृद्गंध' मन शांत करतो; कुमारवाचकांची वाचनतृष्णा, या कथांचा 'मृद्गंध' नक्कीच शांत करेल, हा विश्वास आहे.

